# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते
### क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी-15.
**काआअ/14430 /क्षरुस(वआ) दि. ०६.०३.२०२४**

## <u>जाहिरात</u>

सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत क्षयरोग रुग्णालय समूहाच्या आस्थापनेवरील **'क्ष-किरण सहाय्यक'** संवर्गातील 05 पदे एका वर्षाकरिता कंत्राटी तत्वावर प्रत्येकी 6 महीन्यानंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मासिक ठोस मानधन रु.16,000/- (रुपये सोळा हजार फक्त) इतक्या वेतनावर भरण्याकरिता खालील नमूद अर्हता धारण केलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**'क्ष-किरण सहाय्यक'- 5 पदे**

**शैक्षणिक अर्हता-**

1. उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठामार्फत चालविला जाणारा क्ष-किरण विषयातील बी.पी.एम.टी हा 3 वर्षाचा पुर्णवेळ पदवी अभ्यासक्रम उतीर्ण झालेला असावा. (प्रथम प्राधान्य)

   **किंवा**

   उमेदवार 12 वी (विज्ञान)/12 वी (MCVC) आणि रेडीओग्राफी डिप्लोमा उत्तीर्ण असावा. (द्वितीय प्राधान्य)
2. उमेदवारास महानगरपालिकेच्या खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade Test) परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
3. उमेदवारांना संगणकाचे ज्ञान अवगत करणे आवश्यक आहे. त्याने/तिने (डी.ओ.ई.ए.सी.सी.) सोसायटीचे (सी.सी.सी.) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. तथापी नियुक्तीच्या वेळी सदर प्रमाणपत्र प्राप्त केलेले नसल्यास नियुक्तीपासून दोन वर्षात सदर प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.
4. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा किमान 50 गुणांची प्रश्नपत्रीका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

   वयोमर्यादा–उमेदवाराचे वय 33 वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.(मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा 38 वर्षापेक्षा अधिक असता कामा नये)

**सर्वसाधारण अटी-**

1. सार्वजनिक आरोग्य खात्याच्या अखत्यारीतील विभाग/कार्यालये यांच्या आस्थापनेवरील 'क्ष-किरण सहाय्यक' यांच्या रिक्त पदांच्या प्रमाणात आणि कार्यभार पाहुन कंत्राटी पध्दतीने प्रत्येकी रु.16000/- (सोळा हजार मात्र प्रतिमाह) मानधनावर प्रत्येकी सहा महिन्यांनी एक दिवसाचा तांत्रिक सेवाखंड देऊन एका वेळी सहा महिन्यांच्या कालावधीकरिता स्थानिक पातळीवर कंत्राटी तत्वावरील 'क्ष-किरण सहाय्यक' या पदांकरीता अर्ज मागवुन निवडीने भरण्यात येतील.

2. सदर कंत्राटी तत्वावरील 'क्ष-किरण सहाय्यक' या पदावर निवडलेल्या उमेदवारांकडून 200 रुपयांच्या बॉन्ड पेपरवर करारनामा (प्रतिज्ञापत्र) घेण्यात येईल.

3.कंत्राटी कालावधीत काम करणा-या उमेदवरांची सेवा महापालिकेच्या नियमित तत्वावरील सेवेसाठी सेवाजेष्ठतेसाठी विचारात घेतली जाणार नाही किंवा सेवेला सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही. तसेच भविष्यात त्यांना 'क्ष-किरण सहाय्यक' पदावर हक्क सांगता येणार नाही.

4. रुग्णालय प्रमुखांच्या शिफारशीने असमानधानकारक कामाकरिता किंवा इतर कोणत्याही कारणासाठी कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सदर उमेदवारांची सेवा कोणतीही पुर्वसुचना दिल्याशिवाय समाप्त करण्यात येईल.

5. सरळसेवेने 'क्ष-किरण सहाय्यक' या संवर्गातील पदे भरल्यानंतर कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

**<u>कर्तव्ये व जबाबदा-या</u>-**

1) रुग्णाना 24x7 सेवा देणे, बाह्यरुग्ण सेवा व आंतररुग्ण सेवा व अतिदक्षता सेवा, शस्त्रक्रीया सेवा इत्यादी रुग्णांना क्ष-किरण विभागाशी निगडीत सेवा पूरविणे.

2) तीन्ही पाळीमध्ये काम सांभाळणे.

3) कामावर असताना युनिफार्म परिधान करणे.

5) वरिष्ठ पातळीवरुन वेळोवेळी नेमुन दिलेल्या जबाबदा-या पार पाडणे.

वैद्यकीय अधिक्षक क्षयरोग रुग्णालय समुह यांचे कार्यालय येथे जाहिरात प्रसारित झाल्यापासुन (दि. २८.०३.२०२४ पर्यंत) आलेले अर्ज वॉक-इन पध्दतीने निवडण्यात येतील.

**पत्ता- वैद्यकीय अधिक्षक, क्षयरोग रुग्णालय समूह,**
**जेरबाई वाडीया रोड, शिवडी, मुंबई-400015.**
**संपर्क - भ्रमणध्वनी** :- 9321549133/ 9833486150

.

Sd/-
**वैद्यकीय अधिक्षक**
**क्षयरोग रुग्णालय समूह**

**क्ष-किरण सहाय्यक**
**वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)**

उमेदवाराने त्यांचे अलिकडे आढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फॉटोवर स्वाक्षरी करावी
२.५ से.मी X ३ से.मी

१. (अ) संपूर्ण नांव (आडनांव प्रथम) ( मराठीत) : ________________

(ब ) वडिलांचे / पतीचे संपूर्ण नांव : ________________

(क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिनांकरिता) : ________________

२. अ) पत्ता (पोस्टल पिनेकोडसह) : ________________

________________

________________

(ब) दूरध्वनी क्रमांक (एसटीडी क्रमांकासह) भ्रमणध्वनी

(क) ई-मेल आयडी

३. लिंग : पुरुष स्त्री :

४. अ) जन्मदिनांक : दिनांक महिना वर्ष

ब) दि. ०१/०३/२०२२ रोजी असलेले वय ______ वर्षे ________ महिने __________ दिवस

५. शैक्षणिक अर्हता :-

| शैक्षणिक अर्हता | विद्यापीठाचे नांव | गुणांचा तपशील | | टक्केवारी | उत्तीर्णतेचे प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | | |
| दहावी | | | | | |
| बारावी | | | | | |
| पदवी / पदवीका | | | | | |

६. संगणकविषयक ज्ञान : MS-CIT किंवा शासनाने विहित : आहे / नाही
केलेल्या संगणकविषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र

७. अनुभव ( असल्यास प्रमाणपत्र जोडावे ) :

८. स्थानिक पोलिस ठाण्याचा संपूर्ण पत्ता : ________________

________________

९. अ)  उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ?    होय / नाही.

ब)  शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

क) उमेदवारा विरुध्द पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का ? असल्यास तपशील द्यावा.

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी ...................................... पदाकरीता पात्र आहे. वरीलपैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार रहाणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपलिका माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

आपला / आपली विशवासू

दिनांक :                                                            अर्जदाराची सही/-
ठिकाण :                                                            (अर्जदाराचे नाव)

सोबत   :

1. PHOTO
2. PAN CARD
3. AADHAR CARD
4. SSC / HSC LEAVING CERTIFICATE
5. SSC / HSC MARK LIST
6. DIPLOMA CERTIFICATE
7. DEGREE CERTIFICATE
8. EXPERIENCE CERTIFICATE